# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 30.12.2024** **वार– सोमवार**

---

**लष्करदिन**

येत्या 15 जानेवारीला होणाऱ्या लष्कर दिन संचलनाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात बॉम्बे इंजिनीअरिंग ग्रुप आणि सेंटर परेड मैदानावर आज लष्कर दिन संचलनाची रंगीत तालीम झाली. लष्कर दिनाचं संचलन दरवर्षी नवी दिल्लीतच होत होतं; मात्र गेल्या दोन वर्षांपासून हे संचलन दिल्लीबाहेर आयोजित केलं जात आहे. यावर्षी पहिल्यांदाच महाराष्ट्रात पुण्यामध्ये या लष्कर दिन संचलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. आज रंगीत तालीम तसंच तंत्रज्ञान आणि उपकरणांचं प्रदर्शनही भरवण्यात आलं होतं. 15 जानेवारीला होणारं लष्कर दिन पथसंचलन नागरिकांना पाहता येणार आहे; त्यासाठीच्या नोंदणीकरता तयार केलेल्या मोबाइल ॲप्लिकेशनचंही उद्घाटनही आज झालं. यंदाच्या लष्कर दिन संचलनाला केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, आणि लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी उपस्थित राहणार आहेत.

**पोलिस बंदोबस्त**

कोरेगांव भीमा इथं येत्या 1 जानेवारी रोजी होणाऱ्या अभिवादन कार्यक्रमासाठी पाच हजार पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दलाचे एक हजार जवान आणि 750 पोलीस अधिकारी तैनात असतील, असं पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं. कोरेगाव भिमा परिसरात 45 ठिकाणी वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे. 300 सीसीटीव्ही, 10 ड्रोन, आणि 50 पोलीस टॉवरद्वारे परिसरात देखरेख ठेवली जाईल. चोरीच्या घटना रोखण्यासाठी विशेष पोलीस पथकही तैनात असेल असं अमितेश कुमार यांनी सांगितलं.

त्याचबरोबर नवीन वर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर, उद्या 31 डिसेंबर रोजी पुण्यात 3 हजार पोलीस- अधिकारी कर्मचारी आणि 700 वाहतूक पोलीस तैनात करण्यात येणार आहेत. असंही अमितेश कुमार म्हणाले. शहरात 23 ठिकाणी तपासणी करण्यात येणार आहे. पहाटे पाच वाजेपर्यंत मद्याची दुकानं सुरू ठेवण्याला परवानगी आहे. या संबंधीच्या नियमांचं पालन न करणाऱ्या पब आणि हॉटेल्सवर कारवाई केली जाईल, असा इशारा कुमार यांनी दिला.

**सोमवती अमावस्या**

जेजुरी गडावर आज सोमवती अमावस्या यात्रा मोठ्या उत्साहात  साजरी करण्यात आली. दुपारी एक वाजता देवाच्या उत्सवमूर्तींचा पालखी सोहळा कऱ्हा स्नानासाठी काढण्यात आला. यावेळी देव संस्थानच्या वतीने

बंदुकीच्या फैरी झाडून सलामी देण्यात आली. भाविकांनी 'येळकोट येळकोट जय मल्हार', 'सदांनंदाचा येळकोट' असा जयघोष करत भंडाऱ्याची उधळण केली. सोमवती अमावस्यनिमित्त जेजुरीत सुमारे चार लाख भाविक दाखल झाले आहेत.

**<u>सेवा से सीख उपक्रम</u>**

राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय संचालनालय तसंच क्रीडा आणि युवा व्यवहार मंत्रालयाच्या सूचनेनुसार पुणे जिल्हयातील महाविद्यालयांमध्ये सेवा से सीख हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. यामध्ये आरोग्यसेवा क्षेत्रात प्राथमिक देखभाल, प्रशासकीय साहय, औषधोपाचर अशा कामांमध्ये स्वयंसेवकांना सहभागी करून घेण्यात येणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉक्टर सदानंद भोसले यांनी ही माहिती दिली.

**<u>पीएमपी</u>**

पीएमपीएमएलच्या ताफ्यात नवीन वर्षात 16शे बस येणार आहेत. यातल्या 200 सीएनजी बस पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका घेऊन देणार आहे. 400 सीएनजी बस पीएमपी भाडेतत्त्वावर घेणार आहे. आणि केंद्राच्या एका योजनेतून 1 हजार बस मिळण्याची शक्यता आहे.

**<u>पुस्तक प्रकाशन</u>**

डॉ. राजेंद्र झुंजारराव यांच्या पाच बालकविता संग्रहाचं प्रकाशन पुण्यात काल झालं. झुंजारराव यांनी लिहिलेल्या या कविता बालमनाला नक्कीच भुरळ घालतील असं मत बालभारतीचे संचालक डॉ. कृष्णकुमार पाटील यांनी यावेळी व्यक्त केलं. किशोर मासिकाचे संपादक किरण केंद्रे, आणि गरवारे महाविद्यालयाच्या मराठी विभागप्रमुख डॉ. वर्षा तोडमल यावेळी उपस्थित होत्या. बोकोबाची ऐशी तैशी, बोके, माकड आणि लोणी, खारुताईचे गाणे, चिमण्यांची शाळा, आणि किती ही सुंदर बाग या संग्रहांचं प्रकाशन काल करण्यात आलं.

**<u>साहित्य संमेलन</u>**

विवेक साहित्य मंचानं विविध संस्थांच्या सहयोगानं येत्या शनिवारी नुक्कड साहित्य संमेलन आणि रविवारी नुक्कड बालसाहित्य संमेलनाचं आयोजन पुण्यात केलं आहे. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या एम्फी थिएटरमध्ये होणारं हे संमेलन रसिकांसाठी विनामूल्य खुलं आहे, अशी माहिती आयोजकांनी दिली आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 31 तर किमान तापमान 17 पूर्णांक 6 दशांश अंश सेलसियस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान असेल तसंच हवामान कोरडं राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये. नमस्कार.**